महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ७७ वी बैठक

| | |
|---|---|
| बैठक दिनांक | दिनांक:-०३-एप्रिल-२०२३ |
| ठिकाण | व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे |
| वेळ | सकाळी ११.०० वाजता |

## बैठकीचे इतिवृत्त

**विषय क्रमांक १: - सन्माननीय सदस्यांच्या रजेबाबत.**

**ठराव क्रमांक १: - सन्माननीय सदस्य श्री. फारुक शाह, विधानसभा सदस्य यांची रजा मंजुर करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २: - दिनांक २०.०१.२०२३ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत पुढील प्रारुप ठराव मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.**

**ठराव क्रमांक २: - दिनांक २०.०१.२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

## (आस्थापना विभाग)

**विषय क्रमांक ३ :- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारित जिल्हा स्तरावर कार्यालये सुरु करणेबाबत**

दिनांक २४.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकरीता आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. त्यान्वये जिल्हा स्तरावर २७ जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालये उघडण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड व परभणी येथे जिल्हा स्तरावर कार्यालये असून मुंबई (कोकण), नाशिक, पुणे, अमरावती व नागपूर या महसूली विभागाच्या मुख्यालयात कार्यालयात कार्यालये आहेत.

सुधारित आकृतीबंधानुसार मंजुर २७ जिल्ह्यांमध्ये जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालये सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. सर्व

3/4/23

क्षेत्रीय कार्यालयांसाठी अंदाजित ५०० चौ.फु. इतक्या आकाराची जागा जिल्ह्याच्या मुख्यालयी भाडेतत्वावर घेण्यात येतील.

**ठराव क्रमांक ३:** सुधारित आकृतीबंधानुसार २७ जिल्ह्यांमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालये सुरु करण्यास वक्फ मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

## (लेखा विभाग)

**विषय क्रमांक ४ :- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वित्तीय नियोजनासाठी स्वतंत्र फर्मची सेवा घेणेबाबत**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना सन २००२ मध्ये झाली असून त्या अंतर्गत जवळपास १४००० वक्फ संस्था नोंदणीकृत आहेत. तथापि वक्फ मंडळाचे वार्षिक उत्पन्न केवळ ४-५ कोटी दरम्यान आहे. वक्फ मंडळाच्या अखत्यारित वक्फ संस्था व त्यांच्या मालमत्ता विचारात घेता, मंडळाचे उत्पन्न अत्यंत त्रोटक आहे. सबब, वक्फ मंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच सदर उत्पन्न योग्य मार्गी खर्ची करण्यासाठी स्वतंत्र वित्तीय सेवा पुरविणा-या स्वतंत्र फर्मची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक ४: -** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वित्तीय नियोजनासाठी स्वतंत्र फर्मची सेवा घेण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे. याबाबतची निविदा प्रसिद्ध करण्यापुर्वी सदस्यांच्या सूचनांचा विचार करण्यात यावा.

## (सियानत विभाग)

**विषय क्रमांक ५:- उर्स कालावधीत वक्फ संस्थांचे उत्पन्न वाढविण्यासाठी निविदा प्रक्रियांचा वापर करणेबाबत**

राज्यातील विविध वक्फ संथांमध्ये दरवर्षी उर्स साजरा करण्यात येतो. काही वक्फ संस्थांमधील उर्सचा व्याप खुप मोठा असतो. तथापि, वक्फ संस्थांमार्फत त्याचे व्यवस्थित व्यवस्थापन करण्यात येत नसल्याने त्यामधून खुप कमी उत्पन्न प्राप्त होते. तसेच उर्स कालावधीत जागेचा वाटप, दुकानांना परवानगी, इत्यादी बाबींमध्ये पारदर्शकता नसल्याबाबत वक्फ मंडळास तक्रारी प्राप्त होतात.

3/4/23

वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या परभणी जिल्ह्यातील तुराबुल हक या वक्फ संस्थेच्या उर्स कालावधीदरम्यान मंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबवून उर्सचे नियोजन करण्यात आले. त्यामधून वक्फ संस्थेला २ कोटींपेक्षा जास्त उत्पन्न मिळाले.

अशाप्रकारची कार्यपद्धती राज्यातील मोठ्या वक्फ संस्थेच्या उर्स कालावधीसाठी वापरल्यास वक्फ संस्थांना त्याचा मोठा फायदा होईल.

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२ (२) (c) व (o) येथील तरतुदीनुसार वक्फ संस्थांना निदेश देण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक ५:-** राज्यातील वक्फ संस्थांचे उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच उर्स कालावधीत पारदर्शकता येण्यासाठी वक्फ मंडळाच्या निगराणीखाली निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदर्श कार्यपद्धती निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करणेबाबत वक्फ संस्थांना निदेश द्यावेत.

## (विधी विभाग)

**विषय क्रमांक ६:- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २०-१०-२०१२ च्या आदेशानुसार सुरु असलेल्या प्रकरणांमध्ये विहित चौकशी कार्यपध्दतीचा अवलंब करणेसंबंधी.**

दिनांक २३-०३-२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचे दालनात विधी विभागातील विधी अधिकारी तसेच विधी सल्लागार यांचे सह मा. सर्वोच्च न्यायालय यांचे कडील एस.एल.पी. न.३१२८८-३१२९०/२०११ मध्ये दाखल दिवाणी अपील क्र.७८१२-७८१४/२०२२ निर्णय दिनांक २०-१०-२०१२ चा अनुषंगाने सदर ट्रस्ट नोदणी अंतर्गत असलेली मिळकत ही वक्फ मिळकत आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी करावी लागणारी चौकशी संदर्भात चर्चा विनिमय होऊन या संदर्भात दोन्ही विधी सल्लागार यांनी आपले लेखी अभिप्राय दिलेले आहे.

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ४० (३) व Maharashtra State Wakf Rules २०२२ या नियमातील नियम क्र.१७ व १८ मधील तरतुदीनुसार प्रथम चौकशीची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करून ती वक्फ मंडळापुढे ठेवणे या कार्यवाहीचा अवलंब करणेसाठी वक्फ मंडळा समोर प्रस्ताव ठेवणेबाबत चर्चा झालेली आहे.

नियम क्र.१७(१) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३९(१) अन्वये वादातील मिळकत ही वक्फ मिळकत आहे किंवा असे व वक्फ चा उद्देश या बद्दल २०२२ चे नियामातील फार्म न. १० मध्ये नमूद केल्या प्रमाणे चौकशीची नोटीस देणे बाबत तरतूद आहे.

नियम १७ पोट नियम ३ ते ६ मध्ये चौकशी ची कार्यपद्धती नमूद केली आहे. त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (Code of Civil Procedure १९०८) प्रमाणे कागदपत्र दाखल करून घेणे, साक्षीदाराची जबानी नोंदवणे वृतांत नोदणी करणे कार्य नमूद वर पद्धतीचा अवलंब करून चौकशी अधिकारी यांनी ६ महिन्यात चौकशी पूर्ण करून चौकशी नंतर ३० दिवसात वक्फ मंडळास अहवाल सादर करण्याची तरतूद आहे.

नियम १८-(1) मध्ये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४०(1) प्रमाणे मुख्य कार्यकारी कार्यकारी अधिकारी यांनी या नियम सोबत जोडलेल्या फार्म नं. ११ मध्ये माहिती संकलन करण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने त्या अनुषंगाने सविस्तर अहवाल मा. वक्फ मंडळाकडे सादर करावयाचा आहे. तरी सदर प्रकरणात चालू असलेली सुनावणीची कार्यवाही अंतर्गत प्रथम मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचे कडुन नियम १७ व १८ च्या अनुषंगाने चौकशी रितसर पुर्ण झाल्यानंतरच वक्फ मंडळा समोर अंतिम निर्णयासाठी सादर करणे या कार्यवाहीचा अवलंब करण्यासाठी प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करणे योग्य वाटते करिता निर्णयासत्व.

**ठराव क्रमांक ६:-** प्रस्ताव मान्य. महाराष्ट्र राज्य वक्फ नियम, २०२२ मधील नियम १७ व १८ येथील विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल मंडळास सादर करावा. सदर कार्यवाही ३ आठवड्यांमध्ये पुर्ण करावी. इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता सदर ठरावानुसार कार्यवाही सुरु करावी.

**विषय क्रमांक ७ :- ॲड. जावेद आर शेख यांची नियुक्ती बाबत.**

वक्फ मंडळाच्या सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित एस.एल.पी तसेच एस.बी.यु.टी. शी संबंधीत प्रकरणे हाताळण्यासाठी ॲड जावेद आर शेख यांची ०१/०१/२०२० पासुन रुपये २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार) मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी ३०/११/२०२२ रोजी संपुष्टात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या दि. ११.१२.२०२२ च्या बैठकीत ठराव क्र. ३९ अन्वये दि. ०१.१२.२०२२ ते २८.०२.२०२३ पर्यंत नियुक्तीस मुदत वाढ देण्यात आलेली होती.

त्यांच्या नियुक्तीचा कालावधी दि. २८.०३.२०२३ रोजी संपुष्टात आला असल्याने यापुढे मुदतवाढ देण्यात यावी किंवा कसे याबाबत चा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ७ :-** मा. सर्वोच्च न्यायालयात सद्यस्थितीत सुरु असलेल्या प्रकरणांच्या यादीसह सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, | |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य,<br>म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या,<br>म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ५ | मा. फारुख अन्वर शाह,<br>मा. विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य,<br>म.रा.व.मं. औरंगाबाद | ------ |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| | | |
| | श्री. मो. बा. ताशिलदार,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |